# आरक्षण धोरण व जागतिकीकरणाचा मराठा समाजाच्या सामाजिक व आर्थिक स्थितीवर झालेला परिणाम : एक चिकित्सा

संशोधक विद्यार्थी
अमोल कैलासराव देशमुख
(समाजशास्त्र विभाग)

मार्गदर्शक
डॉ.बी.बी. डोंगरे
प्राचार्य
मोरेश्वर महाविद्यालय भोकरदन
ता. भोकरदन जि. जालना

भारतीय समाजव्यवस्था ही विविध जाती, धर्म, भाषा आणि संस्कृतींनी समृद्ध असून प्रत्येक समाजघटकाच्या विकासासाठी भारतीय राज्यघटनेत समानता, सामाजिक न्याय आणि संधीची समानता या तत्त्वांना विशेष महत्त्व देण्यात आले आहे. ऐतिहासिकदृष्ट्या व सामाजिकदृष्ट्या मागे राहिलेल्या घटकांच्या उन्नतीसाठी आरक्षण धोरणाची अंमलबजावणी करण्यात आली. या धोरणामुळे शिक्षण, रोजगार आणि राजकीय प्रतिनिधित्वाच्या क्षेत्रात अनेक वंचित घटकांना संधी उपलब्ध झाली. तथापि, बदलत्या सामाजिक आणि आर्थिक परिस्थितीमुळे विविध समाजघटकांकडून आरक्षणासंदर्भात नवीन मागण्या पुढे येऊ लागल्या. महाराष्ट्रातील मराठा समाजाच्या आरक्षणाच्या मागणीने विशेष महत्त्व प्राप्त केले.

मराठा समाज हा महाराष्ट्रातील प्रमुख समाजांपैकी एक असून राज्याच्या सामाजिक, राजकीय, कृषी आणि आर्थिक विकासात त्याचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. परंपरेने हा समाज मुख्यतः शेतीवर अवलंबून राहिला आहे. परंतु बदलते हवामान, शेतीतील घटते उत्पन्न, जमिनीचे तुकडीकरण, वाढता उत्पादन खर्च, बेरोजगारी आणि शिक्षणातील वाढती स्पर्धा यांमुळे समाजासमोर नवीन आर्थिक आणि सामाजिक आव्हाने निर्माण झाली आहेत. या पार्श्वभूमीवर शिक्षण व रोजगाराच्या संधी वाढाव्यात या उद्देशाने आरक्षणाची मागणी अधिक तीव्र झाली. दुसरीकडे, १९९१ नंतर भारताने उदारीकरण, खासगीकरण आणि जागतिकीकरणाची आर्थिक धोरणे स्वीकारली. या धोरणांमुळे भारतीय अर्थव्यवस्थेत व्यापक बदल घडून आले. उद्योग, सेवा, माहिती-तंत्रज्ञान, शिक्षण आणि आंतरराष्ट्रीय व्यापाराचा विस्तार झाला. रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध झाल्या; परंतु त्याचबरोबर स्पर्धा, कौशल्याधारित रोजगार आणि तांत्रिक शिक्षणाचे महत्त्वही वाढले. या बदलांचा परिणाम ग्रामीण व शहरी समाजांवर वेगवेगळ्या स्वरूपात झाला. जागतिकीकरणामुळे मराठा समाजाच्या जीवनशैलीत, शिक्षणाकडे पाहण्याच्या दृष्टिकोनात, रोजगाराच्या स्वरूपात आणि आर्थिक रचनेत महत्त्वपूर्ण बदल झाले. अनेक युवक शेतीव्यतिरिक्त उद्योग, सेवा, व्यवसाय आणि उद्योजकतेकडे वळले, तर मोठ्या प्रमाणावर ग्रामीण भागातून शहरांकडे स्थलांतरही झाले. तथापि, या संधींचा लाभ सर्व घटकांना समान प्रमाणात मिळाला नाही. आर्थिक विषमता, कौशल्याचा अभाव, बेरोजगारी आणि ग्रामीण-शहरी दरी यांसारखी आव्हाने कायम राहिली.